साप्ताहिक

# हॅलो न्यूज

e-mail-hellonewskrd@gmail.com

संपादक : विशाल वामन पाटील

पोस्ट परवाना :
KRDDN/026/2026-28

HELLO NEWS

✻ सातारा ✻ वर्ष १ ✻ अंक १६ ✻ मराठी ✻ सोमवार १४ सप्टेंबर ते २० सप्टेंबर २०२६ ✻ PRGI. MHMAR/26/A3624 ✻ पाने ४ ✻ किंमत ३ रुपये

✻ Satara ✻ Year 1 ✻ Volume 16 ✻ Marathi ✻ Monday 14 September to 20 September 2026 ✻ PRGI. MHMAR/26/A3624 ✻ Page 4 ✻ Price 3 Rs.

# मराठ्यांचे वादळ धडकणार

## मुंबईत जाणारच जरांगेंची घोषणा, १९ सप्टेंबरपासून आझाद मैदानात उपोषण

**जालना, वृत्तसंस्था**

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी आता आरपार लढाईची वेळ आली असून आपण १९ सप्टेंबरपासून मुंबईत आझाद मैदानावर बेमुदत उपोषण सुरू करू, अशी घोषणा मराठा नेते मनोज जरांगे यांनी शनिवारी केली. यामुळे ऐन गणेशोत्सवात पुन्हा एकदा मराठा आंदोलकांचे वादळ मुंबईवर धडकणार असल्याचे स्पष्ट झाले.



गेल्या १५ दिवसांपासून जालना जिल्ह्यातील अंतरवाली सराटी यांनी मराठा समाजाला आरक्षण मिळाल्याशिवाय आपण माघार घेणार नाही असे जाहीर केले.

हे आंदोलन पूर्णपणे शांततेच्या मार्गाने आणि लोकशाहीच्या चौकटीत राहूनच केले जाईल, कोणीही दगडफेक किंवा जाळपोळ करू नये, प्रत्येकाने आचारसंहितेचे काटेकोर पालन करावे, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले. अंतरवाली सराटी येथे शनिवारी मराठा समाजाची महत्त्वाची आणि निर्णायक बैठक जरांगे-पाटलांच्या नेतृत्वाखाली झाली. मुंबईला जायचे फायनल झाले आहे, अशी घोषणा त्यांनी यावेळी केली आहे. मुंबईला येऊ इच्छित नसलेल्या मराठा बांधवांनी मुख्य रस्त्यावर येऊन आंदोलनकर्त्यांचे स्वागत करावे आणि त्यांना आशीर्वाद द्यावा, सर्वांनी एकाच मार्गाने मुंबईकडे जावे, मार्ग बदलू नये आणि संपूर्ण प्रवासात शांतता व शिस्त पाळावी, असेही त्यांनी स्पष्ट केले.

# भक्तीच्या जल्लोषात कृष्णामाईची श्रावणी यात्रा दिमाखात संपन्न

**कराड, प्रतिनिधी**

कृष्णा-कोयना नद्यांच्या पवित्र प्रीतिसंगमावर स्थानापन्न असलेल्या कराडनगरीची ग्रामदेवता श्री कृष्णामाईची शेवटच्या श्रावणी सोमवारची यात्रा मोठ्या भक्तिभावाने, उत्साहात संपन्न झाली.

कराड पंचक्रोशीसह विविध भागांतून आलेल्या हजारो भाविकांनी कृष्णामाईच्या दर्शनासाठी गर्दी केल्याने अवघा कृष्णा घाट व प्रीतिसंगम परिसर भक्तांनी अक्षरशः फुलून गेला होता. कृष्णामाईच्या नावानं चांगभलच्या जयजयकाराने कृष्णा घाट व प्रीतिसंगम परिसर दुमदुमून गेला. कृष्णामाई मंदिरात पहाटेपासून पूजा- अर्चा, धार्मिक विधी पार पडले. परंपरेनुसार कराडसह पंचक्रोशीतील विविध ठिकाणच्या देवदेवतांच्या पालख्या सवाद्य मिरवणुकीने कृष्णामाईच्या भेटीस आणण्यात आल्या. पारंपरिक वाद्यांच्या गजरात



निघालेल्या पालखी मिरवणुकांमुळे यात्रेच्या उत्साहात आणखी भर पडली. तसेच महिला व युवतींनी कृष्णामाई देवीबरोबरच कृष्णा नदीचीही खणा-नारळाने ओटी भरून श्रद्धा व्यक्त केली. फुलांनी सजवलेली कमान, आकर्षक मखर, भरजरी साडी आणि सुवर्ण अलंकारांनी नटलेले कृष्णामाई देवीचे देखणे रूप भाविकांचे विशेष आकर्षण ठरले. देवीचे हे दिव्य रूप पाहून भाविक भक्तिरसात चिंब झाले होते. यात्रेनिमित्त कृष्णा घाट परिसरात पूजेचे साहित्य, प्रसाद, मेवा-मिठाई, खाद्यपदार्थ तसेच खेळणी व विविध वस्तूंची दुकाने थाटण्यात आली होती. या दालनांमध्ये दिवसभर भाविक व यात्रेकरूंची गर्दी दिसून आली.




**निवेदन :**

गणेशोत्सव निमित्त साप्ताहिक हॅलो न्यूज च्या चालू आठवड्यातील अंकासोबत आरती पुस्तक देत आहोत.

– संपादक

# श्री क्षेत्र हेळगावचा महागणपती : १६२ वर्षांची ऐतिहासिक, धार्मिक व सांस्कृतिक परंपरा

**संदीप पारवे (मसूर)**

पडिले हे रुढी जगा परिचारा ।
करिती व्यवहार सत्य म्हणोनि ।।


संत तुकाराम महाराज सांगतात त्याप्रमाणे समाज अनेक जुन्या परंपरांना धर्माचे स्वरूप देऊन पाळत असतो. परंतु, या परंपरा केवळ रीतीरिवाज नसून ते संस्कृतीचे आणि एकतेचे प्रतीक असतात. सातारा जिल्ह्यातील कराड तालुक्याच्या उत्तरेकडील टोकावर, निसर्गाच्या कुशीत वसलेले हेळगाव हे याचे उत्तम उदाहरण आहे. पूर्वेला महादेवाचे पठार, दक्षिणेला थोराबाचा डोंगर, उत्तरेला पिराचा डोंगर आणि पश्चिमेला वाहणारी पावन कृष्णा नदी अशा निसर्गरम्य परिसरात वसलेले हे सुमारे चार हजार लोकवस्तीचे गाव. आरोग्यमय सामाजिक भान जपत आणि तरुणांच्या पुढाकाराने आपल्या १६२ वर्षांच्या गणेशोत्सव परंपरेचा वारसा हेळगाव ग्रामस्थ अत्यंत श्रद्धेने जपत आहेत.

**शिवकालीन मंदिरात गणेशोत्सवाची सुरुवात**

हेळगाव येथील गणेशोत्सवाची प्रथा ब्रिटिश राजवटीपासून, म्हणजेच विसाव्या शतकाच्या सुरुवातीपासून चालत आली आहे. गावाला मोठी धार्मिक परंपरा लाभली असून, येथील एकादशी जागराला १०० वर्षे तर पारायण सोहळ्यास ५० वर्षे पूर्ण झाली आहेत.

गणेशोत्सवाची सुरुवात सुमारे १६२ वर्षांपूर्वी झाली. सुरुवातीच्या काळात गोपाळ गणेश कुलकर्णी आणि गावातील १२ बैती (बारा बलुतेदार) एकत्र येऊन हा उत्सव साजरा करत असत. वर्गणी म्हणून घरोघरी जाऊन शेरभर ज्वारी आणि चार आणे गोळा केले जात असत. गावातील प्राचीन शिवकालीन मंदिरातच श्री गणेशाची स्थापना करण्याची प्रथा सुरू झाली. आज सर्व भाविकांच्या देणगीतून आणि सहकार्यातून या मंदिराचा भव्य जीर्णोद्धार झाला आहे. प्रशस्त सभामंडप, रंगरंगोटी आणि नयनरम्य विद्युत रोषणाईमुळे हे मंदिर केवळ धार्मिक केंद्र न राहता सामाजिक व विवाह सोहळ्यांचे प्रमुख ठिकाण बनले आहे.

**अखंड हरिनाम सप्ताह अन् सांस्कृतिक वैभव**



पूर्वी श्रावण महिन्यात होणारा अखंड हरिनाम सप्ताह आता महागणपतीवरील वाढत्या श्रद्धेपोटी गणेशोत्सव काळातच आयोजित केला जातो. गणेशोत्सवाच्या दिवसांत मंदिरात दररोज विविध धार्मिक कार्यक्रम, महाप्रसाद आणि आरतीचे आयोजन केले जाते. शेवटच्या दोन दिवसांत भाविकांची अलोट गर्दी असते.

**तमाशा कलावंतांची अनोखी श्रद्धा**

हेळगावच्या महागणपती यात्रेचे एक विशेष वैशिष्ट्य म्हणजे तमाशाची सुपारी. अशी लोकश्रद्धा आहे की, हेळगावच्या गणेश यात्रेची तमाशाची सुपारी ज्या मंडळाला मिळते, त्यांचा संपूर्ण वर्षाचा सीझन अत्यंत यशस्वी आणि लाभदायक जातो. त्यामुळे गणेश चतुर्थीच्या दिवशी होणाऱ्या बैठकीला परिसरातील अनेक तमाशा मंडळे आवर्जून उपस्थित राहतात. जुन्या काळात केवळ ज्वारी, गहू आणि तांदूळ यांसारख्या धान्याच्या मोबदल्यात तमाशाचे खेळ सादर केले जात असत.

**विशिष्ट विसर्जन परंपरा आणि भव्य यात्रा**

सामान्यतः अनंत चतुर्दशीला गणपती विसर्जन केले जाते, परंतु हेळगावच्या महागणपतीचे विसर्जन अनंत चतुर्दशीनंतरच्या चौथ्या दिवशी (भाद्रपद कृष्ण द्वितीयेला) होते.

पारावरील सोहळा : विसर्जन प्रथेनुसार, पहाटे ४ वाजता श्रींची मूर्ती रथात बसवून ग्रामपंचायतीसमोरील पारावर आणली जाते. तेथे तमाशाची गणगवळण सादर केली जाते. स्थानिक श्रद्धेनुसार, गणगवळण ऐकल्याशिवाय महागणपती तिथून हलतच नाही! त्यानंतरच विसर्जन मिरवणुकीला दिमाखात प्रारंभ होतो.

वार्षिक यात्रा : ऐन पावसाळ्यात यात्रा असूनही आजवर पावसाने यात कधीही व्यत्यय आणलेला नाही. यात्रेदरम्यान दुकाने, लहान मुलांचे पाळणे, श्री दत्त ग्रामविकास मंडळ, भारतमाता गणेश मंडळ व यात्रा कमिटीतर्फे मनोरंजनाचे कार्यक्रम आयोजित केले जातात. यात्रेच्या मुख्य दिवशी भरणाऱ्या कुस्त्यांच्या फडात नामवंत पहिलवान हजेरी लावतात.

योग्य नियोजनातून विकसित झालेले हे देवस्थान केवळ धार्मिक श्रद्धेचे केंद्र नसून, संस्कृती, लोककला आणि सामाजिक एकोप्याचे प्रतीक आहे. नवसाला पावणारा आणि भक्तांच्या हाकेला धावणारा हेळगावचा हा महागणपती आज द्विशतकाकडे यशस्वी वाटचाल करत असून, पंचक्रोशीतील हजारो भाविकांचे परम श्रद्धास्थान बनला आहे.

संपादकीय

# सरकारी फसवेगिरीच्या चक्रात महाराष्ट्र

लोकशाहीत बहुमत कितीही मोठे असले तरी जनता त्याहून मोठी असते. आज सरकारने जनतेचा आवाज ऐकला नाही, तर उद्या जनता सरकार बदलेल. कारण लोकशाहीत जनता मालक असते याचे भान सत्ताधाऱ्यांनी ठेवावे.

महाराष्ट्र आज संकटात आहे आणि या संकटांची तीव्रता वाढत असताना राज्य सरकार मात्र सत्तेच्या अहंकारात मश्गूल आहे. शेतकरी आभाळाकडे डोळे लावून पावसाची वाट पहात बसला आहे, विद्यार्थी न्याय आणि परीक्षेतील पारदर्शकतेसाठी रस्त्यावर उतरले आहेत, आदिवासी आपल्या मूलभूत हक्कांसाठी संघर्ष करत आहेत, मराठा आणि धनगर समाज आरक्षणाच्या प्रलंबित प्रश्नासाठी आंदोलन करत आहेत, तर बेरोजगारी, महागाई आणि कर्जबाजारीपणाने सामान्य माणसाचे जगणे मुश्कील झाले आहे. महाराष्ट्रातील प्रत्येक घटक आज प्रश्न विचारत रस्त्यावर उतरला आहे; पण सत्ताधाऱ्यांकडे उत्तर नाही. प्रश्न सोडवण्याऐवजी समित्या, बैठका आणि आश्वासनांचा खेळ सुरू आहे; जनतेचा आवाज ऐकण्याऐवजी आंदोलने दडपण्याचा मार्ग स्वीकारला जात आहे. त्यामुळे आज महाराष्ट्रातील संकटे केवळ नैसर्गिक, आर्थिक किंवा सामाजिक राहिलेली नाहीत; ती सरकारच्या निष्क्रियतेने आणि संवेदनाहीन कारभाराने अधिक गंभीर बनली आहेत.

भर पावसाळ्यात महाराष्ट्र दुष्काळात होरपळत आहे. मराठवाडा, विदर्भ, खान्देश आणि पश्चिम महाराष्ट्रातील बहुतांश तालुक्यांमध्ये गेल्या महिनाभरापासून पावसाने दडी मारली आहे. नदी-नाले कोरडे पडले आहेत. खरीप पिके करपण्याच्या मार्गावर आहेत. बहुवार्षिक फळबागा धोक्यात आल्या आहेत. जनावरांसाठी चारा आणि माणसांसाठी पिण्याचे पाणी हा गंभीर प्रश्न बनत आहे. रब्बी हंगामाची शाश्वती नाही. शेतकऱ्याने बियाणे, खते, कीटकनाशके, मजुरी यावर केलेला खर्च वसूल होईल की नाही, याची चिंता त्याला सतावत आहे. कर्जमाफीच्या घोषणांचा गाजावाजा झाला; मात्र प्रत्यक्षात किती शेतकऱ्यांना त्याचा लाभ मिळाला, हा स्वतंत्रपणे तपासण्याचा विषय आहे. एकीकडे शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवण्याच्या घोषणा आणि दुसरीकडे त्याच्या उत्पादन खर्चाची भरपाई न होण्याची परिस्थिती, ही विसंगती सरकारच्या कृषी धोरणाचे अपयश अधोरेखित करते. दुष्काळाच्या या संकटाला फक्त निसर्गाचा कोप म्हणून झटकून टाकता येणार नाही. दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाल्यावर सरकार व प्रशासनाने तातडीने पाणी, चारा उपलब्ध करून का दिले नाही, दुष्काळी उपाययोजना का केल्या नाहीत? हा खरा प्रश्न आहे.

शेतकऱ्यांनंतर सर्वाधिक अस्वस्थता विद्यार्थ्यांमध्ये आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कारभारावर सातत्याने प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. विविध स्पर्धा परीक्षांमधील पेपरफुटी, निकालातील गोंधळ आणि प्रक्रियेतील पारदर्शकतेचा अभाव यामुळे लाखो विद्यार्थ्यांचे भविष्य अंधकारमय झाले आहे. पुणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, नागपूर, कोल्हापूर यांसह राज्यातील विविध शहरांमध्ये विद्यार्थी सातत्याने आंदोलने करत आहेत. औषध निरीक्षक परीक्षेच्या पेपरफुटीप्रकरणी गुन्हे दाखल झाले असले तरी या संपूर्ण व्यवस्थेची जबाबदारी निश्चित करण्याचा प्रश्न अजूनही कायम आहे. एखाद्या परीक्षेचा पेपर फुटणे म्हणजे केवळ एका परीक्षेतील गैरप्रकार नाही; तो मेहनत, गुणवत्ता आणि स्पर्धात्मक व्यवस्थेवरील विश्वासाचा भंग असतो. आयोगाच्या अध्यक्षांनी पदभार स्वीकारण्यापूर्वीच पेपर फुटल्याचे सांगितले, पण त्यांच्या कार्यकाळात पेपरफुटीची तक्रार करणाऱ्या विद्यार्थ्यांना पेपरफुटीचे पुरावे दोषी अधिकाऱ्यांकडे देण्यास सांगणे हा त्याहून अधिक गंभीर प्रकार आहे. आयोग चोरीच्या प्रकरणाचा तपास दरोडेखोराकडे देत असेल तर निष्पक्ष तपासाची अपेक्षा कशी करायची?

पुण्यात एमपीएससीची तयारी करणारा धाराशिव जिल्ह्यातील विद्यार्थी प्रथमेश देशमुख याच्या आत्महत्येच्या घटनेने विद्यार्थ्यांच्या मनातील अस्वस्थता आणि त्यांच्या भवितव्यापुढील प्रश्न किती गंभीर झाले आहेत, हे पुन्हा अधोरेखित झाले आहे. परीक्षा आणि भरती प्रक्रियेतील अनागोंदी, पारदर्शकतेचा अभाव आणि प्रशासनाची उदासीनता यामुळे विद्यार्थ्यांवर निर्माण होणारा मानसिक आणि सामाजिक ताण चिंताजनक आहे. ही काही एकमेव घटना नाही; राज्याच्या विविध भागांतून विद्यार्थ्यांच्या अस्वस्थतेच्या घटना सातत्याने समोर येत आहेत. सरकारने आता संवेदनशीलतेने आणि तातडीने परीक्षा व भरती प्रक्रियेतील त्रुटी दूर करून विद्यार्थ्यांचा विश्वास पुनर्स्थापित करणे गरजेचे आहे.

# ‘आजी’ दिसली; पालकमंत्र्यांनी ताफा थांबवला!

**सातारा, (हॅलो न्यूज)**

राजकारणाच्या धावपळीत माणुसकी हरवते, अशी टीका नेहमीच केली जाते. मात्र, शनिवारी साताऱ्यात घडलेल्या एका छोट्याशा प्रसंगाने याला वेगळेच उत्तर दिले. जिल्ह्याच्या राजकीय आणि प्रशासकीय कामांच्या व्यापात असतानाही पालकमंत्री शंभूराज देसाई यांचे लक्ष शिवतीर्थाच्या भिंतीलगत एकाकी बसलेल्या सुमारे ८० वर्षीय वृद्धेकडे गेले आणि त्यांनी क्षणाचाही विलंब न करता आपला वाहनताफा थांबवला. ताफ्यातून खाली उतरत थेट त्या वृद्धेजवळ जाऊन त्यांनी तिची आस्थेवाईकपणे चौकशी केली. या प्रसंगातून त्यांच्या सामाजिक संवेदनशीलतेचे दर्शन घडले.

महत्त्वाचे म्हणजे, हा प्रसंग कोणत्याही नियोजित कार्यक्रमाचा भाग नव्हता. ना त्यासाठी प्रसिद्धीची तयारी होती, ना कोणताही औपचारिक सोहळा. राजकीय आणि प्रशासकीय कामांच्या धावपळीतून जात असताना रस्त्याकडेला एकटी बसलेली वृद्ध महिला दिसली आणि पालकमंत्र्यांनी आपला ताफा थांबवलाइतकाच हा प्रसंग. त्यामुळेच या कृतीची चर्चा साताऱ्यात रंगली.

# भरलेल्या पिकांवर हुमणीसह किडींचे संकट!

## कराड तालुक्यातील स्थिती : औषध फवारणीचा वाढता खर्च, उत्पादन घटण्याची भीती

**कराड (हॅलो न्यूज)**

समाधानकारक पावसामुळे यंदा खरीप हंगामातील पिके जोमाने वाढत असतानाच आता किडींच्या वाढत्या प्रादुर्भावाने शेतकऱ्यांसमोर नवे संकट उभे ठाकले आहे. विशेषतः भुईमूग पिकात हुमणी कीड आढळून येत असल्याने कराड तालुक्यातील शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. पिके वाचविण्यासाठी औषधांची फवारणी करण्याची वेळ शेतकऱ्यांवर आली आहे.

यंदा आतापर्यंत झालेल्या समाधानकारक पावसामुळे खरीप पिकांची वाढ चांगली झाली आहे. शेतकरी सध्या भांगलणीसह अंतरमशागतीच्या कामात व्यस्त आहेत. मात्र, पिके जोमात असतानाच विविध किडी व रोगांचा प्रादुर्भाव जाणवू लागल्याने शेतकऱ्यांच्या आशेवर पाणी फिरण्याची शक्यता निर्माण झाली आहे.



**औषध फवारणीचा खर्चही वाढला.**

किडींपासून पिकांचे संरक्षण करण्यासाठी शेतकऱ्यांकडून कीटकनाशकांची फवारणी सुरू करण्यात आली आहे. मात्र, वारंवार फवारणी करावी लागत असल्याने औषधे, मजुरी आणि फवारणीचा खर्च वाढत आहे. आधीच बियाणे, खते, मशागत आणि मजुरीच्या वाढलेल्या खर्चामुळे शेतकरी आर्थिक अडचणीत असताना आता किडींच्या संकटाची भर पडली आहे.

यावर्षी म्हणावा तसा पाऊस झालेला नसल्यामुळे पिकांना पाण्याची खूप गरज भासणार आहे. गेल्या दोन ते तीन दिवसांपासून पावसाने देखील उघडीप दिली असून पिकांवर हुमणीसह अनेक किडींचा प्रादुर्भाव दिसू लागला आहे.

**– प्रल्हाद माने**
**शेतकरी, किरपे, ता. कराड**

**हुमणीचा नवा हल्ला**

ऊस पिकासाठी धोकादायक ठरणारी हुमणी कीड आता भुईमूगासारख्या खरीप पिकांमध्येही आढळत असल्याने शेतकऱ्यांच्या चिंतेत भर पडली आहे. किडींचा प्रादुर्भाव वाढत असल्याने पिकांचे नुकसान होण्याची शक्यता असून, त्याचा थेट परिणाम उत्पादनावर होऊ शकतो.

**शेतकऱ्यांकडून कीटकनाशकांची फवारणी**

किडीचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी शेतकऱ्यांकडून कीटकनाशकांची फवारणी सुरू आहे. मात्र, वारंवार फवारणी करावी लागत असल्याने औषधांचा खर्च वाढत असून मजुरी, खते, बियाणे आणि मशागतीच्या वाढत्या खर्चात आणखी भर पडत आहे.

# कराडात एमपीएससीच्या विद्यार्थ्यांचा आक्रोश मोर्चा

## घोषणाबाजी करत अध्यक्षांच्या राजीनाम्याची मागणी : तहसीलदारांना दिले निवेदन

**कराड (हॅलो न्यूज)**

एमपीएससीच्या अध्यक्षांनी तत्काळ राजीनामा द्यावा, सर्व स्पर्धा परीक्षांचे स्वतंत्र ऑडिट करून गैरप्रकारांची उच्चस्तरीय चौकशी करावी आणि दोषींवर कठोरात कठोर कारवाई करावी अशी मागणी करीत कराडमधील स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांनी मंगळवारी कराड शहरातील दत्त चौकापासून ते तहसील कार्यालयापर्यंत आक्रोश मोर्चा काढला. यावेळी इन्कलाब जिंदाबाद, एमपीएसीचे अध्यक्ष राजीनामा द्या..., अशा घोषणा दिल्या. यावेळी तहसीलदार कल्पना ढवळे यांना विविध मागण्यांचे निवेदन देखील त्याच्या वतीने देण्यात आले.



दिलेल्या निवेदनात असे म्हणाले आहे की, गेल्या काही काळापासून विविध शासकीय भरती आणि स्पर्धा परीक्षांचे पेपर फुटण्याच्या घटनांमध्ये मोठी वाढ झाली आहे लाखो तरुण विद्यार्थी अहोरात्र मेहनत करून आर्थिक परिस्थिती नसली तरी कर्ज काढून परीक्षांची तयारी करतात मात्र परीक्षेच्या ऐनवेळी किंवा निकालानंतर पेपर फुटल्याचे समोर येते यामुळे प्रामाणिकपणे अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांचे भवितव्य अंधारात सापडले असून त्यांच्यामध्ये प्रचंड नैराश्याचे वातावरण निर्माण झाले आहे. महाराष्ट्रात साधारण ३५ लाखाहून अधिक विद्यार्थी स्पर्धा परीक्षा व इतर शासकीय भरतीसाठी प्रयत्र करीत असतात या विद्यार्थ्यांमध्ये बहुतांश विद्यार्थी शेतकरी, कामगार, कष्टकरी आणि मध्यमवर्गीय कुटुंबातून येतात परंतु स्पर्धा परीक्षांच्या पेपर फुटीच्या वाढत्या घटनांमुळे या लाखो युवकांच्या भवितव्यावर प्रतिकूल परिणाम होत आहे.

भारतीय संविधानाच्या भाग चौदा (पार्ट ) अनु ३१५ ते ३२३ मध्ये संघ आणि राज्य लोकसेवा आयोगाबाबतच्या घटनात्मक तरतुदी समाविष्ट आहेत; असे असतानाही आयोगाचे पेपर वारंवार फुटणे आणि दोषींचा शोध योग्य पद्धतीने व वेळेत न होणे तसेच आरोपींना उचित शासन न होणे ही बाब पुरोगामी महाराष्ट्रास तसेच लोकशाही राज्यास खचितच शोभनीय नाही, असे निवेदनात म्हंटले आहे.

यावेळी निवेदनाद्वारे विद्यार्थ्यांनी सर्व पेपर फुटी व शासन भरतीमधील गैरव्यवहाराची उच्चस्तरीय चौकशी करावी, चौकशीसाठी एसआयटीची विशेष तपास पथकाची नेमणूक करावी, प्रकरणाची सीबीआय मार्फत चौकशी करून सर्व दोषींना अटक करावी, पेपर फुटी तसेच शासन भरती गैरव्यवहारांतील दोषींवर मोक्का कायद्या अंतर्गत कारवाई करावी, दोषींच्या कुटुंबीयांच्या सर्व मालमत्तेची चौकशी करणारा कडक कायदा तत्काळ लागू करावा, पेपरफुटी, शासकीय भरती गैरव्यवहाराचा निकाल जलद लागण्यासाठी फास्ट ट्रॅक कोर्टाची स्थापना करावी, सर्व परीक्षा अत्यंत सुरक्षितपणे पार पाडण्यासाठी सर्व संबंधित यंत्रणांना आदेश पारित करावे,मी पेपर फुटल्यामुळे रद्द झालेल्या परीक्षांचे शुल्क विद्यार्थ्यांना परत करण्यात, पुढील सर्व होणाऱ्या स्पर्धा परीक्षा या मोफत पद्धतीने घेण्यात याव्यात अशा मागण्या देखील केल्या.

* Satara * Vol- 16 * Isshu- 1 * Marathi * Weklly * Page- 4 * Prise Rs- 3/- * PRGI. MHMAR/26/A3624

साप्ताहिक हॅलो न्यूज (PRGI. MHMAR/26/A3624) हे मराठी पत्रक मालक, प्रकाशक, संपादक विशाल वामन पाटील यांनी मुद्रक सचिन काशिनाथ पाटील यांच्या राजमुद्रा ऑफसेट, २३३, सूर्या कॉम्प्लेक्स कराड, जि. सातारा येथे छापून (मुद्रीत) साप्ताहिक हॅलो न्यूज मुख्य कार्यालय २०६/१, वार्ड नं- ४, मु. पो तांबवे, ता. कराड, जि. सातारा ४१५११४ येथून प्रकाशित केला. (या वृत्तपत्रातील प्रकाशित झालेल्या जाहीरातीसंदर्भात त्या त्या कार्यालयाशी / संस्थेची व्यक्तीश: संपर्क साधुन खात्री करुन पुढील व्यवहार करावा. वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेल्या लेख, वृत्त किंवा इतर मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (काही वाद निर्माण झाल्यास कराड न्यायालया अंतर्गत)

Weekly Hello News publisher, Owner and Editor By Vishal Vaman patil has Printed Sachin kashinath Patil, Rajmudra offset, 233, Surya complex karad, Dist - Satara At published weekly Hello News Head office 206/1 ward no -4, At - Post Tambave, Tal - karad, Dist - Satara 415114

# कृष्णा विश्व विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांकडून फिजिओथेरपी उपचारांवर जनजागृती

**कराड (हॅलो न्यूज)**

जागतिक फिजिओथेरपी दिनानिमित्त कृष्णा कॉलेज ऑफ फिजिओथेरपीच्या विद्यार्थ्यांनी कृष्णा विश्व विद्यापीठ ते दत्त चौक कराड या मार्गावर भव्य रॅली काढली. यावेळी विद्यार्थ्यांनी विविध घोषणा देत, फिजिओथेरपी उपचारांबाबत जनजागृती केली.


जगभरात ८ सप्टेंबर हा दिवस फिजिओथेरपी दिन म्हणून साजरा केला जातो. यंदा ह्रदय व रक्तवाहिन्यासंबंधी आजार आणि स्ट्रोक उपचारात फिजीओथेरपीचे महत्वफया मध्यवर्ती संकल्पनेवर जगभर प्रबोधन केले जाणार आहे. या दिवसाचे औचित्य साधून कृष्णा विश्व विद्यापीठाच्या कृष्णा कॉलेज ऑफ फिजिओथेरपीच्यावतीने भव्य रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. विद्यापीठाचे उपकुलसचिव एस. ए. माशाळकर यांच्या हस्ते रॅलीचे उद्घाटन करण्यात आले. त्यानंतर विद्यार्थ्यांची ही रॅली कृष्णा हॉस्पिटल, कोल्हापूर नाका मार्गे दत्त चौकात पोहचली. यावेळी विद्यार्थ्यांनी विविध घोषणा देत, फिजिओथेरपी



उपचारांबाबत जनजागृती केली.

यावेळी बोलताना कृष्णा कॉलेज ऑफ फिजिओथेरपीचे अधिष्ठाता डॉ. जी. वरदराजुलू म्हणाले, कृष्णा कॉलेज ऑफ फिजिओथेरपी महाविद्यालयाचे हे रौप्यमहोत्सवी वर्ष आहे. आजच्या धकाधकीच्या जीवनशैलीमुळे उच्च रक्तदाब, लठ्ठपणा, शारीरिक निष्क्रियता आणि हृदयरोग यांसारख्या समस्या वाढत आहेत. त्यामुळे नियमित व्यायाम, योग्य आहार आणि निरोगी जीवनशैली यांना विशेष महत्व आहे. ज्यांना उच्च रक्तदाबाचा त्रास आहे, त्यांनी तज्ज्ञ फिजिओथेरपिस्टचा सल्ला घेऊन योग्य व्यायामाचे नियोजन करावे.

यावेळी महाविद्यालयातील प्रा. डॉ. एस. आनंद, डॉ. टी. पूविष्णूदेवी, डॉ. सुरज कणसे, डॉ. संदीप शिंदे, डॉ. मंदार माळवदे, डॉ. स्मिता पाटील, डॉ. तृप्ती यादव, डॉ. वैशाली जगताप, डॉ. पूनम पाटील, डॉ. नम्रता कदम, डॉ. चंद्रकांत पाटील, डॉ. सत्यम भोदाजी, डॉ. प्रगती पाटील, डॉ. श्रद्धा मोहिते, डॉ. मयुरी शहा, डॉ. अंकिता दुर्गावळे, डॉ. ओंकार सोमदे, डॉ. तेजश्री कुंभार, डॉ. धैर्यशील पाटील यांच्यासह विद्यार्थी-विद्यार्थीनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.




# गणेशमूर्ती निर्मितीचा अनुभव घेत विद्यार्थ्यांनी जाणून घेतली मूर्तिकलेची कला

## शिवाजीराव देसाई विद्यालय सोनवडे माध्यमिक विद्यालयाचा अभिनव उपक्रम

**पाटण (हॅलो न्यूज)**

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांना गणेशमूर्ती निर्मितीची प्रक्रिया प्रत्यक्ष पाहता यावी आणि पारंपरिक मूर्तिकलेची माहिती मिळावी, या उद्देशाने मोरणा शिक्षण संस्थेच्या शिवाजीराव देसाई विद्यालय, सोनवडे या माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांनी गणेशमूर्ती बनविणाऱ्या कारखान्यास भेट दिली.


या भेटीदरम्यान विद्यार्थ्यांनी श्री. उमेश कुंभार, श्री. मारुती कुंभार मूर्तिकारांशी संवाद साधत गणेशमूर्ती तयार करण्यासाठी कोणत्या प्रकारची माती वापरली जाते?, एका मूर्तीला तयार होण्यासाठी किती वेळ लागतो?, मूर्तीला आकार देताना कोणत्या अडचणी येतात?, बारीक कलाकुसर व रंगकाम कसे केले जाते? अशा विविध प्रश्नांच्या माध्यमातून गणेशमूर्ती निर्मितीची माहिती जाणून घेतली.

तसेच पर्यावरणपूरक गणेशमूर्तीचे महत्व, नैसर्गिक साहित्याचा वापर आणि गणेशोत्सव पर्यावरणस्नेही पद्धतीने साजरा करण्याची गरज याबाबतही विद्यार्थ्यांना विद्यालयातील उपशिक्षक संतोष कदम, आनंदराव जाधव, मुख्याध्यापक शरद शेजवळ यांनी मार्गदर्शन केले.

# स.गा.म. महाविद्यालयात २२ सप्टेंबर२०२६ रोजी १३९ वा कर्मवीर जयंती सोहळा

**कराड (हॅलो न्यूज)**

रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक पद्मभूषण डॉक्टर कर्मवीर भाऊराव पाटील यांचा १३९ वा जयंती सोहळा २२ सप्टेंबर २०२६ रोजी मोठ्या उत्साहाने आणि आनंदाने संपन्न होत आहे. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे डॉ.दिपक शिकारपूर डिजिटल लिटरसी ॲक्टीवीस्ट एआय एनोव्हेटर, पुणे हे आहेत तर, कार्यक्रमाचे अध्यक्ष रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य ॲड. रवींद्र पवार (भाऊ) हे आहेत. कर्मवीर जयंती सप्ताह औचित्य साधून महाविद्यालयात विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. त्यामध्ये वक्तृत्व निबंध, रक्तदान शिबीर, प्रश्नमंजुषा स्पर्धा, पोस्टर प्रेझेन्टेशन, वृक्षारोपण इ. या विविध उपक्रमांमध्ये विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदवावा व



सर्वांनी सहभागी व्हावे असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रकांत खिलारे यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी समारंभ समितीचे चेअरमन प्रा. सुहास गोडसे (९८९०३६६४४७) यांच्याशी संपर्क साधावा.

# दौलतनगर-मरळी येथे आरटीओ कॅम्प; ८० जणांची ड्रायव्हिंग टेस्ट

**पाटण (हॅलो न्यूज)**

पाटण विधानसभा मतदारसंघातील नागरिकांना परिवहन विभागाच्या सेवा स्थानिक पातळीवर उपलब्ध व्हाव्यात, यासाठी उपप्रादेशिक परिवहन विभाग, कराड यांच्या वतीने दौलतनगर-मरळी (ता. पाटण) येथे मंगळवारी आरटीओ कॅम्पचे आयोजन करण्यात आले. या कॅम्पमध्ये ८० नागरिकांच्या ड्रायव्हिंग टेस्ट घेण्यात आल्या, तर ६८ लर्निंग लायसन्सचे वितरण करण्यात आले. त्यामुळे आरटीओ कार्यालयाशी संबंधित कामांसाठी नागरिकांना कराडपर्यंत जाण्याची होणारी गैरसोय काही प्रमाणात कमी झाली.

महाराष्ट्र राज्याचे पर्यटन, खनिकर्म व माजी सैनिक कल्याण मंत्री तथा पाटणचे आमदार शंभूराज देसाई यांच्याकडे करण्यात आलेल्या मागणीनुसार हा कॅम्प आयोजित करण्यात आल्याचे आयोजकांकडून



सांगण्यात आले. लोकनेते बाळासाहेब देसाई सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन यशराज देसाई यांच्या उपस्थितीत कॅम्पच्या कामकाजाला सुरुवात झाली.

या वेळी प्रादेशिक परिवहन विभागातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. दीपक वाघुले (प्रादेशिक परिवहन अधिकारी), विजय इंगवले (उपप्रादेशिक परिवहन अधिकारी), चैतन्य कणसे (मोटार वाहन निरीक्षक), अविनाश सूर्यवंशी (मोटार वाहन निरीक्षक), स्वप्नील कदम (मोटार वाहन निरीक्षक), श्रीमती रजनी पाटोळे (सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक), योगेश कुंभार तसेच चालक विकास साळुंखे यांच्यासह संबंधित कर्मचारी उपस्थित होते.

# गणेश मंडळांनी सामाजिक उपक्रम राबवून पर्यावरण पूरक गणेशोत्सव साजरा करावा : राजश्री पाटील

## मसूर पोलीस ठाण्यात गणेश उत्सव मंडळांची आढावा बैठक

**मसूर (हॅलो न्यूज)**

गणेशोत्सव जातीय सलोखा राखत, नियमांचे पालन करत पारंपारिक पर्यावरण पूरक आणि सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून तसेच डीजे मुक्त पद्धतीने साजरा करावा असे आवाहन उपविभागीय पोलीस अधिकारी राजश्री पाटील यांनी केले.

गणेश उत्सवाच्या अनुषंगाने मसूर पोलीस ठाण्यात सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाच्या पदाधिकाऱ्यांची बैठक आयोजित करण्यात आली होती यावेळी त्या बोलत होते. यावेळी सहाय्यक पोलीस निरीक्षक आदिनाथ खरात, पोलीस पाटील, विविध राजकीय व सामाजिक क्षेत्रातील नागरिक, गणेश मंडळाचे पदाधिकारी, डीजे मालक तसेच संबंधित



नागरिक उपस्थित होते.

बैठकीच्या शेवटी, उपविभागीय पोलीस अधिकारी श्रीमती राजश्री पाटील आणि मसूर पोलीस ठाण्याच्या वतीने सर्व सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना सर्व नियमांचे पालन करून अत्यंत शांततेत, सुरक्षिततेने आणि आनंदाने गणेशोत्सव साजरा करण्याचे आवाहन करण्यात आले.



# टिळक मध्ये विद्यार्थी शिक्षक दिन उत्साहात संपन्न

**कराड (हॅलो न्यूज)**

शिक्षण मंडळ, कराड संचालित टिळक हायस्कूल, कराडमध्ये विद्यार्थी शिक्षक दिन व शिक्षक गौरव समारंभ उत्साहात संपन्न झाला.टिळक हायस्कूल माजी विद्यार्थी सांस्कृतिक सेवा संघातर्फे सर्व शिक्षकांचा भेटवस्तू व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

**माजी विद्यार्थी संघाने शिक्षकांचा केला सत्कार**

विद्यार्थ्यांनी एक दिवस शिक्षकांच्या भूमिकेत जाऊन अध्यापन करण्याचा अनुभव घेतला. विद्यार्थी अवनीश सूर्यवंशी, अनिश नलवडे, निखिल कुंभार व अवधूत लोहार यांनी मनोगतातून शिक्षकांच्याप्रती आपला आदर व्यक्त केला.

माजी विद्यार्थी सांस्कृतिक सेवा संघाचे अध्यक्ष विनायक विभुते, मुख्याध्यापक पंडित मोरे, उपमुख्याध्यापिका जयश्री शेंडगे, पर्यवेक्षिका वैशाली भोपळे, माजी विद्यार्थी सांस्कृतिक सेवा संघाचे अध्यक्ष विनायक विभुते, उपाध्यक्ष प्रबोध पुरोहित, सचिव श्रीकांत कदम, संचालक सुधीर एकांडे, सचिन घळसासी, विवेक रणसुभे, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. उपक्रमाचे नेटके नियोजन अध्यापक संग्राम माळी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.

# वेणुताई चव्हाण उपजिल्हा रूग्णालयासाठी साडेचार कोटींचा निधी मंजूर करावा

## आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांच्याकडे आ. डॉ. अतुलबाबा भोसले यांची मागणी

**कराड (हॅलो न्यूज)**

कराड शहरासह तालुक्यातील तसेच लगतच्या ग्रामीण व डोंगरी भागातील सर्वसामान्य नागरिकांसाठी महत्त्वाचे आरोग्य केंद्र असलेल्या स्व. सौ. वेणुताई चव्हाण उपजिल्हा रुग्णालयाच्या इमारतीची तातडीने दुरुस्ती व नूतनीकरणासाठी शासनाने ४.५० कोटींचा निधी मंजूर करावा, अशी मागणी आमदार डॉ. अतुलबाबा भोसले यांनी केली आहे. याबाबत त्यांनी आज मुंबई येथे राज्याचे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री ना. प्रकाश आबिटकर यांची भेट घेऊन निवेदन सादर केले.



कराड येथील स्व. सौ. वेणुताई चव्हाण उपजिल्हा रुग्णालयात दररोज मोठ्या संख्येने रुग्ण उपचारासाठी येतात. मात्र, या रुग्णालयाची मुख्य इमारत तसेच आवारातील इतर इमारती जुन्या झाल्या असून, त्यांची मोठ्या प्रमाणात पडझड व झीज झाली आहे. इमारतीच्या दुरवस्थेमुळे पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात गळती होते. तसेच भिंतींना तडे गेले असून, जुने झालेले विद्युत व प्लंबिंगचे जाळे आणि स्वच्छतागृहांची झालेली दुरवस्था यामुळे रुग्ण, डॉक्टर, परिचारिका व इतर आरोग्य कर्मचाऱ्यांना अडचणींचा सामना करावा लागत आहे.

> कराड येथील स्व. सौ. वेणुताई चव्हाण उपजिल्हा रुग्णालयावर कराड शहरासह ग्रामीण आणि डोंगरी भागातील नागरिक मोठ्या प्रमाणावर अवलंबून आहेत. त्यामुळे या रुग्णालय इमारतीच्या दुरुस्ती व नूतनीकरणासाठी निधी मिळावा, याबाबत आरोग्यमंत्र्यांशी सकारात्मक चर्चा झाली. लवकरच हा प्रश्न मार्गी लागून रुग्णांना अधिक सुरक्षित व चांगल्या सुविधा मिळण्यास मदत होणार आहे.
>
> **– आमदार डॉ. अतुलबाबा भोसले**

अशावेळी या इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडिट, तातडीची दुरुस्ती, वॉटरप्रूफिंग, सिव्हिल व इलेक्ट्रिकल नूतनीकरण करणे अत्यंत गरजेचे आहे. या सर्व कामांसाठी शासनाकडून ४.५० कोटींचा निधी तातडीने मंजूर करून उपलब्ध करून द्यावा, अशी आग्रही मागणी आमदार डॉ. भोसले यांनी आरोग्यमंत्र्यांकडे केली. तसेच रुग्णालयाच्या इमारतीची सुरक्षितता आणि तेथील आरोग्यसेवेचा दर्जा सुधारण्यासाठी या कामांना प्राधान्य देण्याची मागणीही त्यांनी केली.

यावेळी आरोग्यमंत्री ना. प्रकाश आबिटकर यांनी कराड उपजिल्हा रुग्णालयाच्या दुरुस्ती व नूतनीकरणाच्या मागणीवर तातडीने सकारात्मक निर्णय घेऊन, आवश्यक निधी उपलब्ध करून देण्याची ग्वाही आ.डॉ. अतुलबाबा भोसले यांना दिली.

# राष्ट्रवादी (शरदचंद्र पवार) गटाला मोठा धक्का

## किवळमधील प्रमुख पदाधिकाऱ्यांचा आ. घोरपडेच्या उपस्थितीत भाजपमध्ये प्रवेश

**मसूर (हॅलो न्यूज)**

राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे कराड उत्तर प्रसिद्धीप्रमुख तथा नवजीनाथ देवस्थान समितीचे सचिव रामराव साळुंखे यांच्यासह सोसायटीचे संचालक संतोष साळुंखे आणि अभय साळुंखे यांनी भारतीय जनता पक्षात जाहीर प्रवेश केला. दीर्घकाळ पक्षासाठी निष्ठापूर्वक काम करूनही सातत्याने झालेली उपेक्षा आणि कार्यकर्त्यांच्या प्रश्नांकडे झालेले दुर्लक्ष यामुळे हा निर्णय घेतल्याचे पदाधिकाऱ्यांनी सांगितले. आम्ही आयुष्यभर फक्त पक्षाचे झेंडेच नाचवायचे आणि सतरंज्याच उचलायच्या का? कोणाच्या ताटाखालचे मांजर बनून जगणे माझ्या रक्तात नाही, अशा कडक शब्दांत रामराव साळुंखे यांनी आपल्या भावना व्यक्त करत स्वाभिमानासाठी भाजपचा मार्ग निवडल्याचे स्पष्ट केले. या पक्षप्रवेशामुळे किवळ आणि परिसरात राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाला मोठा धक्का बसला असून, आगामी काळात किवळमध्ये भाजपची ताकद अधिक मजबूत होणार असल्याचे मानले जात आहे.

मौजे किवळ (ता. कराड) येथे विविध विकासकामांचा उद्घाटन व भूमिपूजन सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी पंचायत समिती सदस्य डॉ. संतोष पाटील, पं. स. सदस्या कोमल यादव, संतोष वेताळ,



सातारा जिल्हा भारतीय जनता पार्टी सरचिटणीस गणेश जाधव, वामनराव साळुंखे, नवजीनाथ देवस्थान समितीचे सचिव रामराव साळुंखे, कराड उत्तर भाजपा विधानसभा प्रमुख अभियंता आघाडी सागर साळुंखे, प्रशांत घोलप, विजय मोरे, सागर जगदाळे, संदीप सावंत, मारुती घोलप, नवीन कवठे सरपंच गणेश घार्गे, पै. दिपक जाधव, सुनील जाधव, पै. संभाजी पाटील, श्रीकांत पाटील, अमोल साळुंखे तसेच गावातील ग्रामस्थ महिला भाजपाचे सर्व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

किवळ गावाच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक असणाऱ्या मूलभूत सुविधा, रस्ते, पाणी, सार्वजनिक सुविधा आणि नागरिकांच्या गरजा यांना प्राधान्य देत विकासाची कामे केवळ कागदावर न ठेवता ती प्रत्यक्षात आणण्याचा संकल्प आज पुन्हा एकदा अधोरेखित झाला आहे. किवळच्या विकासाचा हा प्रवास असाच अविरत सुरू राहणार असून, कराड उत्तरच्या प्रत्येक गावाला विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी मी कटिबद्ध आहोत असे प्रतिपादन आमदार मनोज घोरपडे यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक भाजप अभियंता आघाडी संयोजक सागर साळुंखे यांनी केले. सूत्रसंचालन आशिष मोहिते तर आभार किसन पावशे यांनी मानले.



# मतदार यादीचा अभ्यास करून जागृतीने मतदार नोंदणीसाठी सहकार्य करा : बाळासाहेब पाटील

**मसूर (हॅलो न्यूज)**

सध्या देशात विद्यार्थी आंदोलन, दुष्काळी परिस्थिती, वाढती महागाई, वाढती बेरोजगारी असे अनेक प्रश्न असून या प्रश्नाकडे केंद्र व राज्य सरकारचे दुर्लक्ष झाले आहे. निव्वळ निवडणुकीकडे पाहून अनेक राज्यकर्ते संदीग्द बोलत आहेत. त्यासाठी आपल्या प्रश्नांसाठी आपणच सतर्क व कटिबद्ध राहिले पाहिजे. आपल्या विचाराचे सरकार आणण्यासाठी मतदारांमध्ये जागृती करून सतर्क रहावे असे आवाहन माजी मंत्री व सह्याद्री कारखान्याचे चेअरमन बाळासाहेब पाटील यांनी केले.

यशवंतनगर तालुका कराड येथे कराड उत्तर व कराड दक्षिण राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या सर्व मान्यवर पदाधिकारी व यांचा नंतर प्रकाशित झालेल्या पुरवणी मतदार यादी संदर्भात, कार्यकर्ता संवाद मेळावा उत्साहात संपन्न झाला. त्यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी सह्याद्रि सहकारी साखर कारखान्याचे व्हाईस चेअरमन कांतीलाल पाटील, कराड पंचायत समितीचे माजी सभापती प्रणव ताटे, कोरेगाव पंचायत समितीचे उपसभापती रवींद्र पवार, कराड पंचायत समितीचे माजी उपसभापती सुहास बोराटे, विद्यमान सदस्य प्रताप चव्हाण, सिद्धार्थ चव्हाण, संगीता चव्हाण, कराड उत्तर चे प्रमुख शंकरराव खापे , कराड कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक उद्धवराव फाळके, सोमनाथ जाधव, राष्ट्रवादी काँग्रेसचे सरचिटणीस संभाजीराव गायकवाड, युवक अध्यक्ष प्रशांत यादव आदींची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रशांत यादव यांनी केले. सूत्रसंचालन संभाजी चव्हाण यांनी केले. आभार कारखान्याचे संचालक सुनील जगदाळे यांनी मानले.

# जखिणवाडी व कालवडे येथे ८८.५० लाखांच्या विकासकामांचे भूमिपूजन व उद्घाटन

**कराड (हॅलो न्यूज)**

कराड दक्षिण विधानसभा मतदारसंघाचे आमदार डॉ. अतुलबाबा भोसले यांच्या विशेष प्रयत्नातून जखिणवाडी (ता. कराड) येथे ५६.५० लाख; तर कालवडे येथे ३२ लाख रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. या निधीतून करण्यात येणाऱ्या विविध विकासकामांचे भूमिपूजन व उद्घाटन आ. डॉ. अतुलबाबा भोसले यांच्या हस्ते मोठ्या उत्साहात करण्यात आले.

जखिणवाडी येथे २५ लाखांच्या निधीतून जिल्हा परिषद शाळेची दुरुस्ती केली जाणार आहे. तसेच ९.५० लाख खर्चून संत रोहिदास नगर येथे काँक्रीटीकरण व पेव्हर्स बसविण्याचे काम आणि ७ लाखांच्या निधीतून अंतर्गत रस्त्यांची सुधारणा केली जाणार आहे. याचबरोबर १५ व्या वित्त आयोगातून ८ लाखांच्या निधीतून रस्ता काँक्रीटीकरण केले जाणार आहे. या कामांचे भूमिपूजन आ.डॉ. भोसले यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच गावात ७ लाखांच्या निधीतून करण्यात आलेल्या अंतर्गत रस्ता सुधारणाचे कामाचे उद्घाटन करण्यात आले.

तसेच कालवडे येथे २५ लाखांच्या निधीतून ग्रामसचिवालय इमारतीचे बांधकाम केले जाणार आहेत. तसेच ७ लाखांच्या निधीतून गावातील स्मशानभूमीकडे जाणाऱ्या रस्त्याचे काँक्रीटीकरण केले जाणार आहे. या कामांचेही भूमिपूजन आ.डॉ. भोसले यांच्या हस्ते करण्यात आले.

याप्रसंगी यशवंतराव मोहिते कृष्णा सहकारी साखर कारखान्याचे संचालक दयानंद पाटील, कराड पंचायत समितीच्या सभापती नंदाताई यादव, सदस्य ॲड. नरेंद्र नांगरे-पाटील, कृष्णा सहकारी बँकेचे संचालक शिवाजीराव थोरात, माजी उपसभापती पै. दादासाहेब थोरात, सरपंच सुदाम मोटे, उपसरपंच शुभम थोरात, बालिश थोरात, जखिणवाडीच्या सरपंच शोभा नलवडे, उपसरपंच शंकर झिंब्रे, तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष मनोहर थोरात, ग्रामपंचायत सदस्य दादासाहेब तडाखे, पै. आप्पासो पाटील,



हिंदुराव पाटील, सचिन मोहिते, अशोक पाटील, भास्करराव पाटील, महेश गुरव, अधिकराव पवार, शिवाजी कणसे, पै. श्रीकांत थोरात, हरिश शेठ, शंकर थोरात, पै. धनाजी थोरात, पै. मनोहर थोरात व ग्रामस्थ मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.